

लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवस्मारक कामाला लवकरच मिळणार गती

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 18/04/२०25 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 85 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com

# आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पिंपरी-चिंचवड शहरात !

## क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.**



या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे भूषवणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे शुक्रवारी (१८ एप्रिल ) रोजी सकाळी ९.४५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याव्यतिरिक्त खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अरूण लाड, उमा खापरे, जयंत आसगावकर, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दिलीप वळसे पाटील, भीमराव तापकीर, विजय शिवतारे, महेश लांडगे, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनिल कांबळे, चेतन तुपे, शरद सोनवणे, सिद्धार्थ शिरोळे, सुनिल शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासणे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके यांची उपस्थिती असणार आहे. तसेच क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

# नवीन अभ्यासक्रम आराखड्यातील तरतुदी टप्प्याटप्प्याने लागू होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा आणि राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्याटप्प्याने लागू करण्यास अखेर शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे.राज्य अभ्यासक्रम आराखडा टप्प्याटप्प्याने लागू होणार त्यानुसार अभ्यासक्रमात बदल त्यानुसार नवीन पाठ्यपुस्तके येतील मूल्यमापनाची पद्धत बदलेल याबाबत चर्चा होत होती, हा आराखडा शैक्षणिक वर्ष 2025 - 26 पासून लागू होणारे हे देखील निश्चित होते. परंतु, त्याबाबत अद्याप अध्यादेश निघाला नसल्याने अंमलबजावणीच्या टप्प्यातील अनेक कामे रखडली होती. या कामांना अखेर गती मिळणार आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आणि नव्या अभ्यासक्रम आराखड्यानुसार आता राज्यात यापुढे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण या स्तराएवजी पायाभूत स्तर पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर, माध्यमिक स्तर हे शब्द वापरण्यात येतील नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी 2025 -26 पासून टप्प्याटप्प्याने होणार आहे.



# लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवस्मारक कामाला लवकरच मिळणार गती

## खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : मावळ लोकसभा मतदारसंघात असलेल्या लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवस्मारक उभारण्यात येणार आहे. या कामासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे शिवस्मारकाचे काम तातडीने हाती घ्यावे, त्याला गती द्यावी. गडावरील महादेवाच्या मंदिराचा जिर्णोधार करावा, अशा सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पुरातत्व विभागाच्या अधिका-यांना दिल्या आहेत. तसेच लोहगडाचा जागतिक वारसा स्थळात लवकरच समावेश होणार असल्याची माहितीही खासदार बारणे यांनी दिली.खासदार बारणे यांनी गुरुवारी लोहगड किल्ल्याला भेट दिली. पूर्ण गडावर



फिरुन पाहणी केली. गडावर चाललेल्या कामाचा आढावा घेतला. यावेळी पुरातत्व विभागाचे पुणे विभागाचे अधिकारी गजानन मांढवरे, शिवप्रेमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन टेकाळे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, माजी सभापती गणेश धानीवले, अलका धानीवले, उपतालुका प्रमुख राम सावंत, चंद्रकांत भोते, अमित कुंभार, युवा सेना तालुकाप्रमुख विशाल हुलावळे, सरपंच सोनाली बैवरे, उपसरपंच पंढरीनाथ विखार, सुनील हगवणे, मुन्ना मोरे, दत्ता केदारी, कमलेश शेळके, सचिन भोरडे, नितीन देशमुख, राजू गुजर, आदी उपस्थित होते.खासदार बारणे म्हणाले, लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवस्मारक उभारण्यात येणार आहे. हे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. या कामासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन आणला आहे. याबाबत केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत आणि राज्याचे पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांची भेट घेणार आहे.

शिवस्मारकाचे काम पूर्णत्वास नेले जाणार आहे. लोहगड किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळात समावेश करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार या किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळात समावेश झाला आहे. लवकरच त्याची घोषणा शासनाकडून होईल. किल्ल्यावरील बुरुजाची डागडुजी, पायऱ्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या आहे.

लोहगडासह मावळात विसापूर, तुंग, तिकोना, राजमाची किल्ले आहेत. जवळच लोणावळा, भाजे लेणी आहे. त्यामुळे किल्ल्यांवर पर्यटक मोठ्या संख्येने येतात. पर्यटन वाढीबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आजच्या पिढीला माहिती व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गड किल्ल्यांवर येणारे शिवप्रेमी, शिवभक्त, पर्यटकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# पूर्णत्वाला गेलेल्या प्रकल्पांची आयुक्तांकडून पाहणी होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शहरातील ज्या प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत, अशा प्रकल्पांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी घेतला आहे. यामध्ये नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावर बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलासह अन्य काही प्रकल्पांचा समावेश आहे.

सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी ते फनटाइम चित्रपटगृहादरम्यान उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. केवळ पथदिवे व दिशादर्शक फलक बसविणे हे काम शिल्लक आहे. महापालिकेच्या वतीने या भागात सव्वादोन किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे काम सुरूच असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्यास या भागातील होत असलेली वाहतूक कोंडी सुटणार आहे. त्यामुळे हा पूल तातडीने नागरिकांना वापरण्यासाठी खुला करावा, अशी मागणी केली जात आहे.

आयुक्त डॉ. भोसले म्हणाले, 'या उड्डाणपुलासह इतर काही प्रकल्पांची कामे पूर्णत्वाला गेली आहेत. त्या सर्वांची पाहणी प्रत्यक्ष जाऊन करणार आहे. येथे सर्व गोष्टी व्यवस्थित झाल्या आहेत, की नाही, याची तपासणी करणे आवश्यक आहे. उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर त्यातील त्रुटींवरून नागरिकांकडून टीका होऊ नये, यासाठी पाहणी करणार आहे.ही पाहणी अचानक केली जाईल. त्यानंतर पूल खुला करण्याबाबतचे निर्णय घेतला जाईल. इतर पूर्ण होत असलेल्या प्रकल्पांची पाहणीदेखील अचानकपणे करणार आहे,' असे त्यांनी सांगितले.




# तडीपार गुन्हेगाराकडून नऊ किलो गांजा जप्त

पिंपरी- चिंचवड : च-होली येथील दाभाडे सरकार चौकात अमली पदार्थ विरोधी पथकाने एका तडीपार गुन्हेगाराला अटक केली. त्याच्याकडून नऊ किलो ४७८ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. भरत दशरथ वाघमारे (वय ३९, दौंड, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरोधात दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सहायक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलीस अंमलदार किशोर परदेशी, मयुर वाडकर, गणेश कर्पे, विजय दौंडकर व निखिल वर्पे, रमेश कारके हे दिघी पोलीस स्टेशन हद्दीतील च-होली बुद्रुक परिसरामध्ये गस्त घालत होते.त्यावेळी त्यांना दाभाडे सरकार चौकाजवळ एक व्यक्ती दुचाकीवर पांढरे हिरवे रंगाचे नायलॉनचे पोते ठेऊन संशयीतरीत्या थांबलेला दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्याला पिंपरी- चिंचवड पोलिसांनी तडीपार केले असल्याचे निदर्शनास आले. त्याच्या गाडीची तपासणी केली असता गाडीवर असेलेल्या पोत्यात गांजा आढळून आला.

पोलिसांनी नऊ किलो ४७८ ग्रॅम गांजा आणि दुचाकी असा एकूण पाच लाख ३३ हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी भरत वाघमारे याच्यावर चाकण पोलीस ठाण्यात २०२४ मध्ये दोन आणि खडक पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल आहे. दिघी पोलीस तपास करीत आहेत.



# आंतरराष्ट्रीय विठ्ठल दिंडीचे वाकड येथे पादुका दर्शन सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वाकड : महाराष्ट्राच्या आराध्य दैवताची, भक्ती व प्रेमाची शंभू-शतकांची परंपरा लाभलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर येथून लंडनकडे प्रस्थान करणाऱ्या आंतरराष्ट्रीय विठ्ठल दिंडीतील पवित्र पादुकांचे दर्शन सोहळा वाकड येथे संत तुकाराम मंगल कार्यालयात भाविकांच्या मोठ्या सहभागाने उत्साहात पार पडला.

हो ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आंतरराष्ट्रीय वारी दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी पंढरपूर येथून प्रारंभ झाली असून ती २१ जून २०२५ रोजी लंडन येथे पोहोचणार आहे. जगातील सर्वात मोठ्या अशा भक्तिपर परंपरेचा हा अनोखा उपक्रम २२ देशांतून प्रवास करत एकूण १८,००० किलोमीटरचे अंतर पार करणार आहे. या वारीतील पहिल्या टप्प्यात वाकड येथील संत तुकाराम मंगल कार्यालयात पादुकांचे दर्शन सोहळा संपन्न झाला. सायंकाळच्या सत्रात वाकड



आणि आजूबाजूच्या परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन श्री शंकरराव वाकडकर, पांडुरंग वाकडकर, चंद्रकांत देवकर, राहुल वाकडकर, अतुल वाकडकर, संतोष वाकडकर समस्त वाकड ग्रामस्थ वाकडकर कुटुंबीय व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. दर्शनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची सोय देखील करण्यात आली होती. वारीचे जागतिकीकरण — एक भक्तिपरंपरेचा जागतिक संदेश

वारीचे प्रमुख श्री अनिल खेडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, "मी गेल्या ७ वर्षांपासून आळंदी ते पंढरपूर अशी पायी वारी करतो. जगात इस्कॉन, अक्षरधाम, तसेच अनेक भारतीय देवतांची मंदिरे आहेत; मात्र पंढरपूरच्या विठ्ठलाची, संत परंपरेची ओळख आणि भक्तीचा अनुभव अजूनही जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचलेला नाही. यासाठीच ही वारी साता समुद्रापार नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे." खेडकर पुढे म्हणाले, "पादुका विमानातून नेण्याची सोय असताना देखील, जशी लाखो वारकरी संसार सोडून पायी वारी करतात, तशीच ही दिंडी २२ देशांतून कारने प्रवास करत लंडनला जाणार आहे. मॉरिशस, न्यू जर्सी, जर्मनीसारख्या देशांमध्ये भारतीय मंदिरे आहेत, पण विठ्ठलाची वारी आणि त्याची भक्तिपरंपरा तिथे पोहोचलेली नाही – ही मराठी माणसाची एक खंत होती."
शासकीय, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पाठिंबा : या उपक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार उदयनराजे भोसले, एमआयटी चे विश्वनाथ कराड, तसेच अनेक वारकरी संप्रदायांचे प्रमुख यांचे पाठबळ लाभले आहे. यूकेमधील ४८ पेक्षा अधिक मराठी मंडळे, तसेच आखात, आयर्लंड, अमेरिका, जर्मनीमधील मंडळे या उपक्रमात सहभागी होत आहेत. तमिळ, गुजराथी, कानडी, तेलगू भाषिक भक्त देखील या सोहळ्यात सामील झाले असून, ते मराठी न समजूनही सहजतेने अभंग म्हणतात – ही वारकरी संप्रदायाची खरी जागतिक ओळख ठरत आहे.

या वारीच्या निमित्ताने लवकरच लंडनमध्ये भव्य श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर उभारण्यात येणार आहे. ही केवळ इमारत नसेल, तर महाराष्ट्राच्या संत परंपरेचा, भक्तीचा आणि अभंगरूपी अध्यात्माचा जागतिक केंद्रबिंदू ठरणार आहे.वाकड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल वाकडकर परिवाराचे विशेष आभार मानण्यात आले. महाराष्ट्राच्या सातशे वर्षांच्या संत परंपरेचा सुवास जगभर दरवळणार असून, ही वारी भक्तीची सीमा पार करून मानवतेच्या एकतेचा संदेश घेऊन निघाली आहे.

# 'संविधान शिल्पकार' महानाटकाला रसिकांचा उदंड प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर आणि भारताच्या संविधान निर्मितीवर आधारित 'संविधान शिल्पकार' नाटक पाहण्यासाठी पिंपरी चिंचवडकर नाट्य रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. आशयसंपन्न कथानक, अभिनय व उत्तम सादरीकरणामुळे एक परिपूर्ण नाटक पाहण्याची संधी यानिमित्ताने रसिकांना मिळाली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वात बुधवारी (१६ एप्रिल) 'संविधान शिल्पकार' या महानाटकाचे सादरीकरण पिंपरी येथील एच.ए.मैदान येथे झाले.

नागपूर येथील 'द बोधिसत्व फाऊंडेशन' संस्थेने सादर केलेल्या या महानाटकाने प्रबोधन पर्वाचा समारोप झाला. याप्रसंगी विचार प्रबोधन पर्वाचे संयोजक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कामगार नेते गणेश भोसले,



कनिष्ठ अभियंता चंद्रकांत पाटील, यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'संविधान शिल्पकार' या नाटकातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांचे कार्य, संविधान निर्माण करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आलेली आव्हाने व त्यावर त्यांनी केलेली मात, असे विविध विषय अतिशय उत्कृष्ट पद्धतीने मांडण्यात आले. युगनायक फेम सुप्रसिद्ध अभिनेते अथर्व कर्वे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका तर विविध पारितोषिक प्राप्त नाट्य व सिने अभिनेत्री सांची जीवने यांनी माता रमाई यांची भूमिका साकारली. या महानाटकात १५० पेक्षा जास्त कलाकारांनी सहभाग घेतला.

गीत, नृत्याने जिंकली मने 'संविधान शिल्पकार' महानाटकामध्ये संविधानाबाबत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांबाबत जनजागृती करणाऱ्या गीतांचा देखील समावेश होता. या गीतांवर कलाकारांनी केलेल्या नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी रॅपर विपीन ताथड यांनी सादर केलेल्या रॅपला रसिकांनी दाद दिली.

मोबाईल टॉर्च लावून रसिकांनी दिला कलाकारांना प्रतिसाद 'संविधान शिल्पकार' या महानाटकाचे सर्वच प्रेक्षकांनी एकाचवेळी मोबाईल टॉर्च लावून प्रतिसाद दिला. भारतीय संविधानाच्या निर्मितीचा प्रवास सहज व सोप्या पद्धतीने या महानाटकाच्या माध्यमातून समजला असल्याच्या भावनाही यावेळी प्रेक्षकांनी व्यक्त केल्या.
विचाराची देवाण-घेवाण करणारे पर्व! क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्व २०२५ चे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ११ एप्रिल ते १६ एप्रिल २०२५ याकाळात आयोजन केले होते. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या पर्वामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद झाले.

यासर्वच कार्यक्रमांना पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. खऱ्या अर्थाने विचारांची देवाण-घेवाण करणारे हे पर्व ठरले असून महानगरपालिकेच्या या कार्यक्रमाचे विविध स्तरातून कौतूक होत आहे. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी महानगरपालिकेच्या विविध विभागांनी परिश्रम घेतले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 18/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नागरी सेवा मुख्य परीक्षा पुढे ढकला ; विद्यार्थ्यांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) राजपत्रित नागरी सेवा मुख्य परीक्षा (राज्यसेवा) 2024 ही 45 दिवस पुढे ढकलावी, तसेच महाराष्ट्र अराजपत्रित गट ब संयुक्त परीक्षेच्या जागा वाढव्याव्यात, अशी मागणी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. या मागणी करिता बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्यावतीने आंदोलन करण्यात आले.राज्यसेवा मुख्य परीक्षा 2024 चा सुधारित निकाल 29 मार्चला जाहीर झाल्यामुळे 26, 27 आणि 28 एप्रिलला होणाऱ्या मुख्य परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नवीन परिपत्रकानंतर 45 दिवसांचा



कालावधी मिळावा, अशी मागणी विद्यार्थी करत आहेत. राज्यसेवा परीक्षा 1 डिसेंबर 2024 ला झाली, 12 मार्चला निकाल जाहीर झाले त्यात मराठा समाजासाठी सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गाचे आरक्षण लागू असतानाही काही मराठा विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यादीत समाविष्ट करण्यात आले. यामुळे इडब्ल्यूएस प्रवर्गातील अनेक विद्यार्थी अपात्र ठरले, परिणामी त्यांना मुख्य परीक्षेसाठी बसण्याची संधी मिळाली नाही. यानंतर आयोगाने 29 मार्चला सुधारित निकाल जाहीर केला, मात्र सुधारित निकालामध्येही चुका असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला तसेच परीक्षेत कटऑफ पेक्षा अधिक गुण मिळवूनही अनेक विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीत नाव नसल्याने त्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधीकरणांमध्ये धाव घ्यावी लागली, आयोगाचे हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचा परीक्षेचा तयारीचा मौल्यवान वेळ वाया गेला, असे आरोपही विद्यार्थ्यांच्या मार्फत होत आहे.

# जर भूतान देशात पेट्रोल 60 रु तर भारतात का नाही ? - इम्रान शेख

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**केंद्र सरकारच्या पेट्रोल डिझेल गॅस दरवाढीच्या विरोधात आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या वतीने दुचाकी हातगाडीवर ठेवून आंदोलन करण्यात आले.**

**"वारे मोदी तेरा खेल सस्ती दारू महंगा तेल" "नही चाहिये अच्छे दिन वापस लाव पुराने दिन" "पेट्रोल डिझेल दरवाढ कमी झालीच पाहिजे" अशा घोषणा युवकांचे वतीने देण्यात आल्या.**




यावेळी बोलताना युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले "2014 पूर्वी कच्चा तेल 140 डॉलर प्रति बॅरल असताना भारतामध्ये 60 रुपये दराने पेट्रोल डिझेल मिळत होते. त्यावेळी दहा पैशांनी पेट्रोल वाढले असता रस्त्यावर उतरणारे भाजप नेते आज मुग गिळून गप्प का आहेत ? आज 2025 साली कच्च तेल 70 रुपये प्रति बॅरल असून पेट्रोल डिझेल 120 रुपये च्या दराने नागरिकांना विकून केंद्र सरकार आणि तेल कंपन्या नफाखोरी करत आहे.

भारताकडून तेल आयात करणाऱ्या भूतान या देशात 60 रुपये प्रति लिटर दराने पेट्रोल मिळत असून आता भारतातील लोकांनी पेट्रोल भरायला भुतान मध्ये जायचं का ? असा खडा सवाल इमरान शेख यांच्याकडून करण्यात आला. यावेळी बोलताना ज्योती निंबाळकर म्हणाल्या "पेट्रोल डिझेल गॅस दरवाढीचा परिणाम दैनंदिन जीवनावर होत असून मध्यमवर्गीयांचे पगार 15 वर्षांपूर्वी होते तेवढेच आहेत परंतु महागाई प्रचंड वाढलेली आहे.

याचा विचार करून सरकारने पेट्रोल डिझेलच्या किमती त्वरित कमी करावे." यावेळी अरुण पवार म्हणाले "2014 च्या आधी 70 रुपये असणारे पेट्रोल चाळीस रुपये पर लिटर करू असं म्हणून मोदी सरकार केंद्रात आले परंतु मागील बारा वर्षात पेट्रोल 40 रुपये कमी करण्याऐवजी 40 रुपये वाढवून जनतेची फसवणूक केली आहे" माजी नगरसेविका प्रियंका ताई बारसे म्हणाल्या "शिक्षण,महागाई,महिला सुरक्षा,रोजगार या सर्व आघाडीवर केंद्रातील आणि राज्यातील भाजप सरकार हे अपयशी ठरला असून याचा आम्ही जाहीर निषेध करतो"

मेघराज लोखंडे म्हणाले "सरकारने सर्व स्तरातून जनतेची लूट लावलेली आहे प्रत्येक गोष्टीवर सेस आणि एक्साईज सरकारच्या वतीने लावले जात असल्याने महागाई वाढत आहे.महागाई वाढवणाऱ्या सरकारचा आम्ही निषेध करतो."

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इमरान शेख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन घेण्यात आले या आंदोलनास महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर,मा नगरसेविका प्रियंका ताई बारसे,अरुणभाऊ पवार, रजनीकांत गायकवाड, मेघराज लोखंडे ओम शिरसागर,गणेश देवराम,मयूर थोरवे,साहिल वाघमारे दानिश अन्सारी, प्रशांत जाधव,शाहिद शेख सार्थक बाराते,सलमान शेख, समाधान अचलखांब,परवेज शेख,गणेश धावरे कल्पना गाडगे,ताहेरा सय्यद,पुष्पा गोपाळे चेतना मेश्राम, सचिन निंबाळकर,साकिब शेख,सिद्धांत कसबे युवक तसेच महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968